# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक ५४, ५५ आणि ५६ / २०२३

वाणिज्य श्रेणी वीज दरसुची व कृषी श्रेणी वीज दरसुचीतील फरक व नुकसान भरपाई मिळण्याबाबत.

| केस क्र. | अपिलार्थी | ग्राहक क्र. | |
|---|---|---|---|
| ५४/२०२३ | श्री नाशिक पंचवटी पांजरपोळ | ०४९०११८०८८४० | |
| ५५/२०२३ | श्री नाशिक पंचवटी पांजरपोळ | ०४९०१३९९१४०४ | .....................अपिलार्थी |
| ५६/२०२३ | श्री नाशिक पंचवटी पांजरपोळ | ०४९०१३९९१०६४ | |

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नाशिक शहर १ (महावितरण) ......... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :-

१) देवांशी भाटीया, ट्रस्टी
२) बोस्को कारवेल्हो, असोशियट मॅनेजर
३) उदय जोशी, मॅनेजर
४) सागर आगळे, मॅनेजर

प्रतिवादीतर्फे :-

१) चेतन वाडे, कार्यकारी अभियंता
२) एस.एम. क्षिरसागर, अतिरीक्त कार्यकारी अभियंता
३) पी.आर. खांडेकर, डेप्युटी मॅनेजर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १६ जून २०२३

आदेश पारित दिनांक :- २३ ऑगष्ट २०२३

# आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, नाशिक परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक ८ मार्च २०२३ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थींने सदरची अभिवेदने दिनांक २३ मे २०२३ रोजी दाखल केली.

२. मंचाने तक्रारदार यांच्या गाऱ्हाण्यांबाबत (क्रमांक १६, १७ आणि १८ - २०२१) दिनांक ८ मार्च २०२३ रोजीच्या पारीत आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

*"१. तक्रारदाराची तक्रार क्रमांक १६/२०२१, १७/२०२१ आणि १८/२०२१ या तिन्ही तक्रारी अंशतः मंजुर करण्यात येते.*

*२. सामनेवाले यांना आदेश देण्यात येतो की, तक्रारदारास सदर आदेश प्राप्तीपासून ३० दिवसात मुद्दा क्र.१ च्या b मधील दोन वीज पुरवठयाची दरसूची श्रेणी शेतीच्या दराप्रमाणे बदल करण्यात यावा.*

*३. सामनेवाले यांना आदेश देण्यात येतो की, तक्रारदारांच्या तिन्ही तक्रारीच्या वीज पुरवठा दिनांकापासून दरसूची श्रेणी वाणिज्यच्या ऐवजी कृषी दराच्या दराने बदल केल्यानंतर जी दर फरकाची रक्कम तयार होईल ती रक्कम द. सा.द. शे. ९ % व्याजासह तक्रारदारास मिळेपर्यंतच्या दिवसापर्यंतची रक्कम पुढील बिलात समायोजीत करावी.*

*४. सामनेवाले यांना आदेश देण्यात येतो की, तक्रारदारास दिनांक २७.०५.१९ च्या पत्रापासून मुदतीत दरसूची श्रेणी शेतीचा बदल करून न दिल्यामुळे विद्युत पुरवठा संहिता व कृती मानके २०२१ च्या विनियम ५(२) नुसार प्रती आठवडा रू.१००/- अर्ज पोहोचलेल्या दिवसापासून तयार होणारी रक्कम तक्रारदारास प्रत्यक्ष्य मिळेपर्यंतच्या दिवसापर्यंतच्या आठवडयाची ही रक्कम अदा करावी.*

*५. मुख्य अभियंता यांना आदेश देण्यात येतो की, आदेश क्र.२ ते ४ पलान करण्यास ज्या संबधीत कर्मचाऱ्यांनी कामात कुचराईपणा केला आहे, त्यांच्याकडून आदेश क्र.३ व ४ ची रक्कम वसूल करण्यात यावी."*

मंचाचे अध्यक्षपदाची जागा रिक्त असल्याने, मंचाचे स्वतंत्र सदस्य यांनी मंचाचे 'अध्यक्ष' म्हणून आदेश पारित केला. तथापि, या आदेशाबाबत तांत्रिक सदस्य यांनी खालील प्रमाणे मत प्रदर्शित केले.

*"मी, सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच, नाशिक, १६/२०२१, १७/२०२१, १८/२०२१ मधील तक्रारीबाबत, सदस्य (प्रभारी) यांच्या मताशी व निर्णयाशी मी अंशतः सहमत नाही. सदर केस मधील ग्राहक*

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

श्री. पंचवटी पांजरापोळ, नाशिक यांचे एकुण ३ ग्राहक क्र. १) ०४९०११८०८८४० सर्व्हे नं. २८८/३, औरंगाबाद रोड, तपोवन २) ०४९०१३९९१४०४ सर्व्हे नं. २४२ म्हसरूळ शिवार ३) ०४९०१३९९१०६४ सर्व्हे नं. २२२ ते २२७, हिरावाडी रोड, कमलनगर ग्राहकांनी वाणीजीक वापरासाठी अर्ज दि. ३०.०७.२०१८, ३१.०५.२०१८ व दि. २४.०७.२०१८ रोजी वरील अनुक्रमे देण्यात आली. सदर ग्राहकाच्या अर्जानुसार थ्री फेज ३.७५ KW वाणीजीक वीज जोडणी क्र. ०४९०११८०८८४० दि. १३.०८.२०१८ रोजी देण्यात आली. तसेच दुसरे कनेक्शन थ्रीफेज ५ KW वाणीजीक वीज जोडणी क्र. ०४९०१३९९१४०४ दि. २०.०७.२०१८ रोजी देण्यात आली, तिसरे कनेक्शन थ्रीफेज ५ KW वाणीजीक वीज जोडणी क्र. ०४९०१३९९१०६४ दि. २४.०७.२०१८ रोजी देण्यात आली.

शेतीपंप दरसंकेत बदलून मिळण्याकरीता ग्राहक क्र. ०४९०१३९९१०६४ साठी दि. ०२.१२.२०१८ रोजी देण्यात आला व त्यानुसार सदर ग्राहकाचा दर संकेत डिसेंबर २०१८ पासून शेतीपंप दर संकेत करण्यात आला.

ग्राहक क्र. ०४९०११८०८८४० व ०४९०१३९९१४०४ साठी ग्राहकांनी दर संकेत बदलण्याचा अर्ज दि. १५.०९.२०१९ रोजी देण्यात आला. ग्राहकांनी अर्ज वाणिजीक कारणासाठी दिलेला असल्यामुळे ग्राहकाचा दर संकेत शेतीपंप करण्यासाठी ग्राहकाच्या दरसंकेत बदलून देण्याच्या अर्ज दिनांकापासून देणे न्यायाचे व योग्य असेल.

३. अपिलार्थींच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व दिनांक १६ जून २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

अपिलार्थीनी नवीन वीज जोडणीसाठी केलेल्या अर्जात मागीतलेला वीज भार व वीज जोडणी दिनांक इत्यादीचा गोषवारा खाली तक्ता क्र.१ मध्ये दिला आहे :-

तक्ता क्र.१

| केस क्र. | अपिलार्थी | पत्ता | ग्राहक क्र. | नवीन वीज जोडणी अर्ज दिनांक | अर्ज केलेला वीज भार | मंजूर वीज भार | वीज जोडणी दिनांक | वीज वापर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५४/२०२३ | श्री नाशिक पंचवटी पांजरपोळ | सर्व्हे नं.२८८ पंचवटी, तपोवन, नाशिक | ०४९०११८०८८४० | ३०.०७.२०१८ | ३.७५ के डब्लू (५ एचपी) | १६.२५ के डब्लू | १३.०८.२०१८ | शेतीसाठी |
| ५५/२०२३ | श्री नाशिक पंचवटी पांजरपोळ | सर्व्हे नं.२४२ म्हसरूळ पंचवटी, नाशिक | ०४९०१३९९१४०४ | २०.०७.२०१८ | ३.७५ के डब्लू (५ एचपी) | ५ के डब्लू | २०.०७.२०१८ | शेतीसाठी |
| ५६/२०२३ | श्री नाशिक पंचवटी पांजरपोळ | सर्व्हे नं.२२२ हिरावाडी, पंचवटी, नाशिक | ०४९०१३९९१०६४ | ३१.०५.२०१८ | ३.७५ के डब्लू (५ एचपी) | ५ एचपी | २४.०७.२०१८ | शेतीसाठी |

- अपिलार्थी यांची १४३ वर्ष जुनी नोंदणीकृत चॅरीटेबल ट्रस्ट आहे, त्यांची पंचवटी, तपोवन, नाशिक परिसरात स्वतःची शेतजमीन आहे. पाण्याची टंचाई असल्याने नवीन कृषी वीज जोडणीची आवश्यकता लागली. तसेच, तेथे गोशाळा, पर्यावरण संवर्धन, जलजीवांचे संवर्धन व जतन, गांयीसाठी सेंद्रीय चारा, इत्यादी कारणास्तव पिक घेणे गरजेचे असल्याने सिंचनाकरीता बोअरवेलची अत्यंत गरज होती

व त्यासाठी वीज कनेक्शनची नितांत गरज होती. म्हणून, अपिलार्थीने नोव्हेंबर २०१८ मध्ये नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केला. पंचवटीमध्ये तपोवन क्षेत्री दर १२ वर्षांनी होणाऱ्या कुंभमेळयासाठी केवळ ६ महिन्यांच्या कालावधीसाठी साधूग्रामची स्थापना केली जाते. पूर्वी जुलै २०१५ ते सप्टेंबर २०१५ या कालावधीसाठी कुंभमेळा आयोजीत केला होता. कुंभमेळयासाठी राखीव असलेला साधुग्राम परिसर असल्याने शेतीसाठी नवीन वीज जोडणी देणे बंद केले होते. प्रतिवादीनी अपिलार्थीस व्यावसायिक कनेक्शन घेण्याचा सल्ला दिला. कारण उपरोक्त भागात नवीन कृषी वीज जोडणी देण्यावर बंदी होती. सबब, अपिलार्थीस व्यावसायिक कनेक्शन घेणे याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. प्रतिवादीने आश्वासन दिले की, व्यावसायीक जोडणी घेतल्यावर कालांतराने त्या वीज जोडण्यांचे कृषी वीज जोडण्यांमध्ये रुपांतरीत करून देऊ. तद्नंतर, प्रतिवादींनी वरील तक्ता क्र.१ मध्ये दाखविल्याप्रमाणे वीज जोडण्या दिल्या. प्रतिवादीने वरील वीज जोडण्यांना वाणिज्यिक श्रेणी वीजदर पत्रकाप्रमाणे आकारणी केली. वाणिज्यिक वीज दराचे, कृषी वीज दरात रुपांतरीत करण्याबाबत अपिलार्थींनी प्रतिवादीस वारंवार अर्ज सादर केले, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणेः-

- **अभिवेदन क्रं. ५४/२०२३ (ग्राहक क्र.०४९०११८०८८४०) सर्व्हे नं.२८८ पंचवटी, तपोवन, नाशिक**
  - अपिलार्थींनी दिनांक १३.०८.१८ रोजी शेतीसाठी वीज जोडणी घेतली. प्रतिवादीने वरील वीज जोडणीस वाणिज्यिक श्रेणीतील वीज दर लावले म्हणून अपिलार्थींनी दिनांक २७.०५.१९, १५.०९.१९, २८.०५.२० आणि २५.०१.२१ रोजी पत्र देऊन प्रतिवादींना वाणिज्यिक श्रेणी दरसूची बदलून कृषीदर सुचीनुसार वीज दर लावण्यासाठी विनंती अर्ज केले. तथापि, प्रतिवादीने त्यात आजतागायत बदल केला नाही. त्यामुळे, अपिलार्थीस, आर्थिक तोटा होत आहे.
- **अभिवेदन क्रं. ५५/२०२३ (ग्राहक क्र.०४९०१३९९१४०४) सर्व्हे नं.२४२ म्हसरूळ, पंचवटी, नाशिक**
  - अपिलार्थींनी दिनांक २०.०७.२०१८ रोजी शेतीसाठी वीज जोडणी घेतली. प्रतिवादीने वरील वीज जोडणीस वाणिज्यिक श्रेणीतील वीज दर आकारणी केली म्हणून अपिलार्थींनी दिनांक २७.०५.१९, १५.०९.१९, २८.०५.२० आणि २५.०१.२१ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिवादींना दरसूची श्रेणीत बदल करून मिळावा यासाठी अर्ज केले. तथापि, प्रतिवादीने त्यात आजतागायत बदल केला नाही. त्यामुळे, अपिलार्थीस, आर्थिक तोटा व गैरसोय होत आहे.
- **अभिवेदन क्रं. ५६/२०२३ (ग्राहक क्र. ०४९०१३९९१०६४ ) सर्व्हे नं.२२२ हिरावाडी, पंचवटी,नाशिक**
  - अपिलार्थींनी दिनांक २४.०७.२०१८ रोजी शेतीसाठी वीज जोडणी घेतली. प्रतिवादीने वरील वीज जोडणीस वाणिज्यिक श्रेणीतील वीज दर आकारणी केल्याने अपिलार्थींनी दिनांक

०२.१२.२०१८ रोजी पत्राद्वारे प्रतिवादींना दरसूची श्रेणी बदलून मिळण्यासाठी अर्ज केला व त्यास अनुसरून प्रतिवादीने डिसेंबर २०१८ पासून कृषीपंप श्रेणीतील वीज दर आकारणी चालू केली.

- महावितरणने दोन वीज जोडण्यांसाठी (ग्राहक क्र.०४९०११८०८८४० व क्र.०४९०१३९११४०४) वाणिज्यिक श्रेणीतील वीज दर संकेत बदलून कृषीपंप श्रेणीतील वीज दर संकेत बदल करून देण्यासाठी वांरवार अर्ज करूनही कार्यवाही केली नाही, म्हणून, अपिलार्थीने दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने अपिलार्थीचे गाऱ्हाणे अंशतः मंजूर केले. मंचाच्या आदेशाने अपिलार्थीचे समाधान झाले नाही, म्हणून अपिलार्थीने दिनांक २३ मे २०२३ रोजी माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) येथे अभिवेदने दाखल केली.

- अपिलार्थीच्या अभिवेदनांत केलेल्या मागण्या खालील तक्ता क्र.२ व तक्ता क्र.३ प्रमाणे आहेत.

तक्ता क्र.२ : श्रेणी दरसुची प्रमाणे वीजदर आकारणीतील फरक :-

| क्र. | केस क्र. | ग्राहक क्र. | वीज जोडणी दिनांक | वीज वापर | दर सुचीतील फरक | व्याज १५ % | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४/2023 | ०४९०११८०८८४० | १३.०८.२०१८ | शेतीसाठी | १८३१३९.३० | २७४७०.९ | २१०६१०.२० |
| २ | ५५/2023 | ०४९०१३९११४०४ | २०.०७.२०१८ | शेतीसाठी | -१५५६२.८० | 0 | 0.00 |
| ३ | ५६/2023 | ०४९०१३९११०६४ | २४.०७.२०१८ | शेतीसाठी | १५६२५.७७ | २३४३.८६६ | १७९६९.६४ |
| | | | | | | एकूण रक्कम | २२८५७९.८३ |

तक्ता क्र.३ : नुकसान भरपाई

| क्र. | केस क्र. | ग्राहक क्र. | वीज जोडणी दिनांक | मे २०२३ पर्यंतचा कालावधी (आठवडयामध्ये) | नुकसान भरपाई प्रती आठवडा | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४/2023 | ०४९०११८०८८४० | १३.०८.२०१८ | २४८ | २५०.०० | ६२000.00 |
| २ | ५५/2023 | ०४९०१३९११४०४ | २०.०७.२०१८ | २४७ | २५०.०० | ६२५00.00 |
| ३ | ५६/2023 | ०४९०१३९११०६४ | २४.०७.२०१८ | २४८ | २५०.०० | ६२000.00 |
| | | | | | एकूण रक्कम | १,८६,२५०.०० |

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

- वरील रक्कम १.२५ % प्रती महिना म्हणजे वार्षिक द.सा.द.शे. १५% व्याज दराने देण्याचे आदेश व्हावेत .
- तक्ता क्र.३ नुसार नुकसान भरपाई देण्याचे आदेश व्हावेत.
- मानसिक त्रास व खर्च इत्यादी पोटी रू.२,००,०००/प्रति-कनेक्शन याप्रमाणे एकूण रू.६,००,०००/- देण्यात यावे. एकूण अपील दावा रक्कम रू.१०,१४,८३०/- इतकी देय व्हावी. (रू.२,२८,५८० + रू.१,८६,२५०/- + रू.६,००,०००/-)

४. प्रतिवादीनी उत्तरात नमुद केलेले मुद्दे व दिनांक १६ जून २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

| केस क्र. | ५४/2023 | ५५/2023 | ५६/2023 |
|---|---|---|---|
| ग्राहक क्र. | ०४९०११८०८८४० | ०४९०१३९९१४०४ | ०४९०१३९९१०६४ |
| पत्ता | सर्व्हे नं.२८८ पंचवटी, तपोवन, नाशिक | सर्व्हे नं.२४२ म्हसरूळ पंचवटी, नाशिक | सर्व्हे नं.२२२ हिरावाडी, पंचवटी, नाशिक |
| नवीन वीज जोडणी अर्ज दिनांक | ३०.०७.२०१८ | २०.०७.२०१८ | ३१.०५.२०१८ |
| अर्ज केलेला वीज भार | ३.७५ के डब्लू (५ एचपी) | ३.७५ के डब्लू (५ एचपी) | ३.७५ के डब्लू (५ एचपी) |
| वीज जोडणी दिनांक | १३.०८.२०१८ | २०.०७.२०१८ | २४.०७.२०१८ |
| अर्जात नमुद केलेला वीज वापर | गायीच्या गोठयासाठी | गायीच्या गोठयासाठी | काहीही नोंद नाही |
| वीज दर श्रेणी | वाणिज्यिक | वाणिज्यिक | वाणिज्यिक |
| वाणिज्यीक दर संकेत बदलून कृषी वीज दर सकेंत साठी केलेला अर्ज | १५.०९.२०१९ | १५.०९.२०१९ | ०२.१२.२०१८ (डिसेंबर २०१८ पासून कृषी दर करुन देण्यात आला) |
| सोलर (Roof Top Solar) | ऑक्टोबर २०२१ नेट मीटरींग | ऑफ ग्रिड सोलर | - |
| शेरा | शेतीपंपासाठी कनेक्शन (ग्राहक क्र.०४९०१७००११२३) पुरवठा दिनांक २४.१०.१९८५ | | |
| मंचाकडे अर्ज केल्याचा दिनांक | १ ऑक्टोबर २०२१ | १ ऑक्टोबर २०२१ | १ ऑक्टोबर २०२१ |
| सुनावणीनंतर प्रत्यक्ष स्थळ तपासणी तारीख | १५.०६.२०२३ | १५.०६.२०२३ | १५.०६.२०२३ |
| वीज वापर | शेतीसाठी | शेतीपंपासाठी वापर होत नसून पत्राच्या शेडला २ टयुबलाईटसाठी वापर. पाण्याची मोटर ऑफग्रिड सोलरला जोडली आहे | शेतीसाठी |

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

- प्रतिवादीनी त्यांचे पत्र क्र. ४९८३ दिनांक १६.०२.२०१९ अन्वये Higher tariff to Lower Tariff दर श्रेणीतील बदल करण्याचे अधिकार हे मंडल कार्यालयास असल्याचे कळविले. त्यानुसार दर श्रेणीतील बदलांचा प्रस्ताव मंडळ कार्यालयास पाठविण्यात आला. सदर पत्राबाबत मंडळ कार्यालयाकडून परिपत्रक मुअ/वितरण/ग्रावि-१/क्र.२०४६५ नुसार लघुदाब वितरण प्रणाली प्रमाणे कृषीपंपाकरीता दिनांक ३१.०३.२०१८ पासून नवीन वीज जोडणी देणे बंद केले होते. मात्र, दिनांक ३१.०३.२०१८ पूर्वीच्या ज्या कृषी पंप धारकांनी पैशाचा भरणा केला आहे, अश्यांना लघुदाब वितरण प्रणाली द्वारे वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. अशा सर्व कृषी पंप धारकांचा नवीन वीज जोडणी अहवाल बाबतची सर्व माहिती दिनांक ३१.०८.२०१८ पूर्वी महावितरणच्या 'माहिती व तंत्रज्ञान प्रणाली' मध्ये भरावयाची होती.

- सदर ग्राहकांचा कोटेशनसाठी भरणा केल्याचा दिनांक ३१.०३.२०१८ नंतरचा आहे व वीज पुरवठा दिनांक ३१.०३.२०१८ च्या आधीचा असून तो लघुदाब वितरण प्रणालीद्वारे करण्यात आलेला आहे. त्यामुळे, त्या ग्राहकांचे वीज दर वाणिज्य श्रेणीतून कृषीपंप श्रेणी असे बदल करता येणार नाहीत, असे कळविण्यात आले. मात्र, ग्राहकास कृषीपंप वीज जोडणी हवी असल्यास, ग्राहकांचे चालू वीज देयक व थकबाकी यांचा भरणा करुन त्यांचा चालू वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करावा; तसेच, महाराष्ट्र विज कृषीपंप धोरण 2020 प्रमाणे नवीन कृषीपंपाचे कनेक्शन देण्यात यावे, असे आदेशीत करण्यात आले. सदर आदेश हा कक्ष अभियंता यांना पुढील कार्यवाहीसाठी दिनांक १७.०९.२०२१ रोजी पाठविण्यात आला होता व त्याबाबत कक्ष अभियंता यांनी संबंधीत ग्राहकास अवगत केले होते. परंतू, त्यानंतर कृषीपंपाचे नवीन कनेक्शनकरीता कुठलाही प्रकारचा अर्ज प्रतिवादीस अपिलार्थीकडून प्राप्त झाला नाही.

- **अभिवेदन क्रं. ५४/२०२३ (ग्राहक क्र.०४९०११८०८८४०) सर्व्हे नं.२८८ पंचवटी, तपोवन, नाशिक**
    - प्रचलित नियमानूसार व्यावसायिक वीज जोडणीवर, रुफ टॉप सोलर नेट मीटरींग अंर्तगत ग्राहकाने मंजुरी घेऊन ऑक्टोबर २०२१ ला करारनामा केला व नेट मीटरींग योजनेअंर्तगत सौर ऊर्जा प्रणाली कार्यान्वियीत करुन घेतली व त्याचा आजतागायत लाभ घेत आहेत.

    - दिनांक दिनांक १५.०६.२०२३ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, त्या ठिकाणी एक घरगुती कनेक्शन (ग्राहक क्र.०४९०१८४७२३०८) आणि एक कृषीपंप कनेक्शन (ग्राहक क्र.०४९०१७००११२३, पुरवठा दिनांक २४.१०.१९८५) अशी दोन कनेक्शन चालू असल्याचे आढळून आले. एकाच परिसरात शेतीसाठी दोन कनेक्शन देणे शक्य नसल्याने, तसेच,

वाणिज्य जोडणीवर सोलार नेट मीटरींग प्रणाली चालू असल्याने सदर जोडणी कृषीपंप करता देता येणार नाही. ग्राहकास हवे असल्यास, चालू वाणिज्य कनेक्शन कायमस्वरूपी बंद करून जुन्या कृषीपंप जोडणीचा मंजूर भार वाढवून देता येईल.

- **अभिवेदन क्रं. ५५/२०२३ (ग्राहक क्र.०४९०१३९९१४०४) सर्व्हे नं.२४२ म्हसरूळ, पंचवटी, नाशिक**
  - सदर प्रकरणी दिनांक १५.०६.२०२३ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता त्या ठिकाणी जमीन नांगरलेली असून त्यामध्ये आंब्याची व निंबाची झाडे आहेत. तसेच, पाण्याची मोटर ऑफ ग्रीड सोलर वर जोडलेली आहे. शेतीपंपासाठी महावितरणच्या कुठलयाही कनेक्शनमधून वीज वापर होत नसून पत्र्याच्या दोन शेडकरीता, २ टयुब लाईटसाठी मीटर मधून वीज वापर चालू आहे.

- **अभिवेदन क्रं. ५६/२०२३ (ग्राहक क्र. ०४९०१३९९१०६४ ) सर्व्हे नं.२२२ हिरावाडी, पंचवटी,नाशिक**
  - सदर ग्राहकाने दिनांक २.१२.२०१८ रोजी वीज श्रेणीतील दरपत्रकानुसार दर बदलून मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार माहे डिसेंबर २०१८ मध्ये कक्ष कार्यालयाने सदर ग्राहकाचा वीज दर वाणिज्य श्रेणीतून कृषीपंप श्रेणीत बदल करण्यात आला होता. सदर प्रकरणी दिनांक १५.०६.२०२३ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, सदर ठिकाणी कृषीपंपासाठी वीज वापर चालू असल्याचे आढळले.

- वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीनी अभिवेदन क्रं. ५४ व ५५ /२०२३ मध्ये गाईच्या गोठयासाठी वीज पुरवठा मागितलेला होता व तो त्यांना देण्यात आला. तसेच, अभिवेदन क्रं. ५६ / २०२३ मध्ये शेतीसाठी मागितलेला होता, तो त्यांना अगोदरच म्हणजे माहे डिसेंबर २०१८ मध्ये देण्यात आला आहे. सबब, अपिलार्थीची गाऱ्हाणी फेटाळण्यात यावीत.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकुण घेतले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. प्रतिवादी महावितरण यांनी महाराष्ट्र शासनाबरोबर विचार विनिमय करून नवीन कृषी धोरण ठरविण्यासाठी महावितरणच्या वेब सेल्फ सर्विस मधील नवीन कृषी वेब पोर्टल दिनांक ३१.०३.२०१८ ते दिनांक ३१.०८.२०१८ पर्यंत बंद करण्यात आले होते. याअगोदर प्रलंबित असलेले मंजूर कृषी जोडण्या देण्याचा विषय सुध्दा होता. तसेच, सौर

ऊर्जेवर चालणाऱ्या पंपाद्वारे वीज जोडणी देण्याचा विषय सुध्दा घेण्यात आला होता. थोडक्यात दिनांक ३१.०३.२०१८ ते दिनांक ३१.०८.२०१८ या कालावधीत शासनाच्या निर्णयानुसार नवीन कृषी पंपाना वीज जोडण्या देणे बंद करण्यात आले होते.

६. असे निदर्शनास येते की, तक्ता क्र.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे व नवीन अर्जाचे (ए-१ फॉर्म) चे अवलोकन केले असता गायीच्या गोठयासाठी वीज जोडणी मिळण्यासाठी (अभिवेदन क्र.५४ व ५५ / २०२३ मध्ये निर्देशीत केलेल्या गाऱ्हाण्याप्रमाणे) जुलै / ऑगष्ट २०१८ मध्ये अर्ज केले व त्यास महावितरणने मंजूरी देऊन वीज जोडण्या देण्यात आल्या.

| केस क्र. | पत्ता | ग्राहक क्र. | नवीन वीज जोडणी अर्ज दिनांक | वीज जोडणी दिनांक | अर्जात नमुद केलेला वीज वापर |
|---|---|---|---|---|---|
| ५४/२०२३ | सर्व्हे नं.२८८ पंचवटी, तपोवन, नाशिक | ०४९०११८०८८४० | ३०.०७.२०१८ | १३.०८.२०१८ | गायीच्या गोठयासाठी |
| ५५/२०२३ | सर्व्हे नं.२४२ म्हसरुळ पंचवटी, नाशिक | ०४९०१३९९१४०४ | २०.०७.२०१८ | २०.०७.२०१८ | गायीच्या गोठयासाठी |
| ५६/२०२३ | सर्व्हे नं.२२२ हिरावाडी, पंचवटी, नाशिक | ०४९०१३९९१०६४ | ३१.०५.२०१८ | २४.०७.२०१८ | काहीही नोंद नाही |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, अपिलार्थींनी गायींच्या गोठयासाठी वीज जोडणी (अभिवेदन क्र. ५४/२०२३ व ५५/२०२३) मागितली होती, ही वस्तूस्थिती होती. अपिलार्थी हे धर्मदाय संस्था असून त्यांची नोंदणीकृत ट्रस्ट म्हणून नोंद आहे. प्रतिवादींनी त्यांना 'वाणिज्य श्रेणीतील दरपत्रक' प्रमाणे वीज दर लावणे हे नियमबाह्य होते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या टॅरीफ ऑर्डरनुसार त्यांना 'पब्लिक सर्व्हिसेस-अदर' ही टॅरीफ कॅटगरी लावणे अपेक्षीत होते.

७ अपिलार्थीने वाणिज्यिक श्रेणीतील वीज दर पत्रकानुसारचे वीज दर बदलून कृषी श्रेणीतील वीज दरपत्रकाप्रमाणे वीज दर आकारणी व्हावी याकरीता केलेल्या अर्जाचा तपशील खालील तक्त्यात दर्शविला आहे.

| केस क्र. | ५४/२०२३ | ५५/२०२३ | ५६/२०२३ |
|---|---|---|---|
| वाणिज्यिक श्रेणीतील वीज दर बदलून कृषी श्रेणीतील वीज दर आकारणीबाबत केलेला अर्ज | १५.०९.२०१९ | १५.०९.२०१९ | ०२.१२.२०१८ (माहे डिसेंबर २०१८ पासून कृषी श्रेणीतील वीज दर करून देण्यात आला) |

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

केस क्र. ५४ व ५५ ऑफ २०२३ मध्ये अजूनपर्यंत टॅरीफ कॅटगरी बदलून दिलेली नाही, तथापि ५६ / २०२३ मध्ये कृषी टॅरीफ कॅटगरी माहे डिसेंबर २०१८ पासून बदलून देण्यात आली.

८. कारवाईचे कारण उदभवलेल्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत गाऱ्हाणी / तक्रारी मंचाकडे अपिलार्थींने दाखल करणे अपेक्षीत होते. परंतू या प्रकरणी अपिलार्थींनी त्यांच्या तक्रारी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी मंचाकडे दाखल केल्या. सबब, ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल, विनियम २०२० मधील कलम ७.८ नुसार अपिलार्थी हे भुतलक्षी प्रभावाने म्हणजे दिनांक १ ऑक्टोबर २०१९ पासून (मागील दोन वर्षाचा कालावधी) टॅरीफ कॅटगरी बदलण्यास पात्र आहेत. दिनांक १ ऑक्टोबर २०१९ पूर्वीची टॅरीफ कॅटगरी बदलून मिळण्याचा कालावधी हा दोन वर्षापेक्षा जास्त असल्याने, तो कालबाह्य ठरून अपिलार्थी लाभास अपात्र आहेत. विनियम ७.८ खालील प्रमाणे.

*"कारवाईचे कारण उदभवलेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत तक्रार दाखल केली नसेल तर मंच गाऱ्हाणे स्वीकारणार नाही."*

९. वीज दराच्या वर्गवारीत बदलाबाबत ग्राहकाने अर्ज केल्याच्या तारखेपासून विनियमाप्रमाणे, दोन महिन्यात टॅरीफ कॅटगरीतील बदल करून देणे अपेक्षीत आहे, व नुकसान भरपाईबाबत 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१' मध्ये जोडपत्र २ नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

जोडपत्र - २

कृतीच्या मानकांची पूर्तता न केल्यामुळे ग्राहकांना द्यावयाची भरपाई

| पुरवठयाचे कार्य / घटना | | मानक | देय भरपाई |
|---|---|---|---|
| ७. अन्य सेवा | | | |
| (दोन) | - वीज दराच्या वर्गवारीत बदल | दुसरे देयक चक्र | रु.१००/- विलंबाच्या प्रती आठवडयास किंवा त्याच्या भागास जास्तीत जास्त रु.५००/- अधीन राहून |

वरील विनियमानुसार अपिलार्थी हे अभिवेदन क्र.५५ व ५६/२०२३ मध्ये रु.५००/- प्रती कनेक्शन याप्रमाणे नुकसान भरपाईस पात्र आहेत.

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

१०. एखादा कृषी ग्राहक, कृषीपंप कनेक्शनसाठी सोलर प्रणाली बसवू इच्छित असेल, तर तांत्रिक दृष्टया महावितरणने त्याचे स्वागतच केले पाहिजे, प्रतिवादीने त्यांना 'नाही' म्हणण्याचे काहीही कारण नाही. अपिलार्थीने अभिवेदन क्र. ५५ / २०२३ मध्ये नेट मीटरींग केले आहे, तर, अभिवेदन क्र.५६ / २०२३ मध्ये ऑफ ग्रिड सोलर कार्यान्वित केले आहे. याबाबत वीज देयके करण्यास काही अडचणी असल्यास प्रतिवादीना मुख्य कार्यालयास संर्पक साधून योग्य तो सल्ला व निर्णय घेण्याचे सुचीत करण्यात येत आहे.

११. अपिलार्थी हे महाराष्ट्र शासन अंर्तगत नोंदणीकृत ट्रस्ट आहे. अपिलार्थीने नमुद केले की, प्रतिवादीच्या सांगण्यावरून A1 फॉर्म मध्ये 'गायीच्या गोठयासाठी' वीज जोडणी हवी अशी नोंद घेतली. पण खरेतर वीज जोडणी शेतीसाठीच पाहीजे होती. प्रतिवादीने सांगण्यावरून अपिलार्थीनी A1 फॉर्म मध्ये वीज जोडणीचा हेतू लिहीणे हे अश्या नोंदणीकृत ट्रस्टने नमुद करणे, ही बाब दिशाभुल करणारी व अशोभनीय आहे, कारण, A1 फॉर्म मधील सर्व तपशीलवार माहितीस फॉर्मवर सही करणारा जबाबदार असतो. अपिलार्थीने स्वतःच्या चुकीकरीता प्रतिवादीस जबाबदार धरू पाहणे हे गैर आहे. अपिलार्थीची सदर बाब प्रतिवादीने पुर्णपणे नाकारली आहे.

१२. अभिवेदन क्र.५४/२०२३ मधील अपिलार्थींचा नवीन वीज जोडणीकरीताचा दिनांक ३०.०७.२०१८ रोजीचा विनंती अर्ज ३.७५ के डब्लु (५ एचपी) वीज भार मंजूरी असताना त्यांचा मंजूर वीज भार १६.२५ के डब्लू आहे या बाबीचे देखील अवलोकन होने अवघड आहे.

१३. अपिलार्थीने नमुद केले की, अभिवेदन क्र.५४/२०२३ मध्ये जरी कृषीपंपासाठी वीज कनेक्शन (ग्राहक क्र.०४९०१७००११२३) पुरवठा दिनांक २४.१०.१९८५ असला तरी नवीन वीज जोडणी देण्याची जागा खुप लांब असून तो जागेचा वेगळा हिस्सा आहे. म्हणून दोन्ही ठिकाणे वेगवेगळी जागा (प्रिमायसेस) धरण्यात यावी.

१४. अपिलार्थीने नुकसान भरपाईपोटी रक्कम रु.२,००,०००/-(प्रती-कनेक्शन) असे एकूण रक्कम रु.६,००,०००/- ची मागणी केली आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, अप्रत्यक्ष नुकसान भरपाई देण्याची विनियमात कोणतीही तरतूद नाही. या संदर्भात विनियम क्र.१७.१५ (५) लक्षात घेणे गरजेचे आहे. सदर विनियम खालीलप्रमाणे आहे.

*"१७.१५(५) ग्राहकाला कोणताही तोटा किंवा नुकसान झाले असल्यास तो निवाडा देईल ती रक्कम भरपाई म्हणून ग्राहकाला अदा करण्याचा निर्देश; आणि / किंवा*

*परंतू तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष, परिणामरुप, आनुषंगिक, दंडात्मक किवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही; "*

१५. मंच त्यांच्या दिनांक ८ मार्च २०२३ च्या आदेशात विनियमाचा योग्य तो अर्थ काढण्यात अपयशी ठरला आहे म्हणुन मंचाचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

१६. वरील सर्व बाबींचा योग्य तो उहापोह करून खालीलप्रमाणे आदेशीत करण्यात येत आहे.

- अभिवेदन क्रं. ५४/२०२३ (ग्राहक क्र.०४९०११८०८८४०) व अभिवेदन क्रं. ५५/२०२३ (ग्राहक क्र.०४९०१३९९१४०४) याची कृषी श्रेणीतील वीज दरपत्रकाप्रमाणे बदलण्यात यावा व वाणिज्य श्रेणीतून कृषी श्रेणीत भुतलक्षी प्रभावाने (Retrospective effect) म्हणजे दिनांक १ ऑक्टोबर २०१९ पासून देण्यात येणाऱ्या, वीज दरातील बदलामुळे, येणाऱ्या फरकाची रक्कम रिझर्व्ह बँक (RBI) च्या लागू असणाऱ्या व्याजदरासह करून ती, येणाऱ्या वीज देयकांत समायोजीत करण्यात यावी.
- अभिवेदन क्रं. ५४/२०२३ (ग्राहक क्र.०४९०११८०८८४०) व अभिवेदन क्रं. ५५/२०२३ (ग्राहक क्र.०४९०१३९९१४०४) प्रकरणी प्रत्येकी रु.५००/- प्रमाणे कृती मानकांची पुर्तता न केल्यामुळे नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.
- प्रतिवादीनी अभिवेदन क्रं. ५४/२०२३ व अभिवेदन क्रं. ५५/२०२३ व्यवस्थित न हाताळल्याने या कारणास्तव चा दंड रक्कम रु.२०००/प्रति अभिवेदन, या प्रमाणे एकूण रक्कम रु.४,०००/- मात्र आकारण्यात येत आहेत व सदर दंडाची रक्कम अपिलार्थींच्या येणाऱ्या वीज देयकांत समायोजीत करण्यात यावी. तसेच,
- अभिवेदन क्रं. ५४/२०२३ मधील ग्राहकाच्या वीज भार मंजूरीमधील तफावत दुर करावी.
- अपिलार्थीच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.

१७. प्रतिवादीने आदेशाची पुर्तता केल्याबाबतचा 'अनुपालन अहवाल' या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करावा.

१८. अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. डी. एस. डुबरे
सचिव
म.वि.नि.आ.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)